• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८८ • गुरुवार,दि.१८ जानेवारी २०२४ •RNI-MAHMAR/2021/80074•Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 288• Thursday 18 Janewari 2024 •RNI-MAHMAR/2021/80074• Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24• Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | औरंगाबाद | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर


# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# आम्ही लढून आरक्षण मिळवणारच -जरांगे



जालना । वृत्तसंस्था

पंतप्रधानांकडून अपेक्षा उरली नाही, मराठ्यांनी सुद्धा आता त्यांच्याकडून अपेक्षा सोडावी असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. आम्ही लढून आरक्षण मिळवणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान १९ जानेवारीला सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावर बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, त्यांचा महाराष्ट्रात येण्याचा आम्हाला काय फायदा आहे. तुम्ही सामान्यांचे नेतृत्व केलेले आहे, तुम्ही राज्य सरकारला आदेश देऊन टाका हे आम्ही त्यांना शिर्डीच्या दौऱ्यावर असतानाच आवाहन केले होते. जो सामान्यांच्या बाजूने बोलणार नाही, ज्याला सामान्यांची गरज राहिलेली नाही, त्यांच्याकडून अशा अपेक्षा करण्याची काय गरज आहे. जरांगे म्हणाले की, आम्ही लढून आरक्षण मिळवतो, हात पसरवण्याची गरज नाही. एकदा आम्ही त्यांना विनंती केली होती. राज्यात एवढे वातावरण ढवळून निघाले असतांना पंतप्रधानांनी त्यात हस्तक्षेप करणे गरजेचे होते. पंतप्रधानांनी आरक्षण देऊन टाका एवढा शब्द काढणे अपेक्षित होते. मात्र, आता त्यांच्याकडून मराठ्यांनी अपेक्षा सोडली आहे. त्यामुळे ते महाराष्ट्रात येऊ की कुठेही येऊ, मराठ्यांनी त्यांची अपेक्षा सोडावी, असेही जरांगे ▸▸ पुढील पानावर

# आमदार संदीपभैय्यांची रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक



**अहमदनगर । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणच्या रेल्वे पुलाच्या विविध अडचणींसदर्भात बुधवार (दि.१७) रोजी अहमदनगर येथे मध्य रेल्वेच्या विभागीय कार्यालयात आ.संदीप क्षीरसागर यांनी रेल्वे अधिकार्यांसमवेत बैठक घेऊन चर्चा केली. यावर रेल्वे अधिकाऱ्यांनी पुढील दोन दिवसांत प्रत्यक्ष ठिकाणांची पाहणी करून कार्यवाही सुरू करणार असल्याचे सांगितले. बीड विधानसभा मतदारसंघात, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. बीड तालुक्यातील नवगण राजुरी, घाटसावळी याठिकाणी पाणी वाहण्यासाठी रेल्वे पूलाचे बांधकाम झालेले आहे परंतू सदरील पूल रहदारीसाठी उपयोगात येत नसल्याने सद्यस्थितीला रहदारीसाठी असंख्य अडचणी येत आहेत. तसेच शिरूर का. तालुक्यातील बरगवाडी व घुगेवाडी या दोन गावांना जोडण्यासाठी व याठिकाणी रहदारी होणेसाठी पूल बांधणे आवश्यक आहे. या ठिकाणांवर ग्रामस्थ, शेतकरी यांना सद्यस्थितीला व भविष्यातही अडचण येऊ नये याकरिता खबरदारी घेणे आवश्यक असून याबाबात सर्वेक्षण होऊन लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी केली. त्यावर रेल्वे विभागाचे निर्माण उप मुख्यअभियंता श्री.आर.के. यादव व संबंधित अधिकारी यांनी पुढील दोन दिवसांत प्रत्यक्ष ठिकाणांची पाहणी करून पुढील कार्यवाहीला सुरूवात करणार असल्याचे सांगितले आहे. या बैठकीस आ.क्षीरसागर यांच्यासोबत माजी आ.सय्यद सलीम व राष्ट्रवादी-काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष मदन जाधव उपस्थित होते.

# कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी मराठवाड्यात विशेष मोहिम

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**




मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात जास्तीत जास्त पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळावेत यासाठी प्रशासनाच्यावतीने १७ व १८ जानेवारी रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिम कालावधीत जात प्रमाणपत्र अर्ज उपलब्ध करुन देणे व आवश्यक कागदपत्रासाठी ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी मदत करतील,असे जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे. मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी,कुणबी-मराठा नोंदी शोधण्याची कार्यवाही प्राधान्याने सुरु करावी. कुणबी असल्याबाबतच्या नोंदी सर्व सामान्य नागरिकांना सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी नोंदीची यादी ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावे. आढळून आलेल्या सर्व नोंदी जिल्हा संकेतस्थळावरही अपलोड करण्यात यावे. कुणबी,कुणबी-मराठा,मराठा-कुणबी नोंदीच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त यांनी दिल्या आहेत. यासाठी १७ आणि १८ जानेवारी रोजी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश विभागीय आयुक्त यांनी दिले आहे. यासाठी विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना पत्र देखील पाठवण्यात आले आहेत. विविध कार्यालयात १९६७ पूर्वीच्या जुन्या अभिलेखांची तपासणी करण्यात येत आहे. तपासणीअंती आढळून आलेल्या नोंदीचा अहवाल वेळोवेळी सादर केला जात आहे. नागरिकांसाठी जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी,आढळून आलेल्या नोंदीची यादी तलाठी व ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तर, ग्रामपंचायत कार्यालयात जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विहित नमुना अर्ज उपलब्ध करुन देण्याची व भरुन घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पूर्ण भरलेला अर्ज जवळच्या महा-ई-सेवा केंद्र अथवा सामाईक सुविधा केंद्रात दाखल करण्यासाठी अर्जदारांना मदत करण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी मदत करणार असल्याची माहिती प्रशासनाच्य वतीने देण्यात आली आहे. नागरिकांनी प्रथम त्यांचेशी संबंधित नोंदी शोधण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आपले पूर्वजांचे नावांचा शोध घ्यावा. संबंधित नोंदी सापडल्यानंतर संबंधित कार्यालयातून नोंदीची प्रमाणित प्रत मिळवावी. उदा. मोडी भाषेतील नमुना ३३ व ३४ साठी संबंधित तालुक्याच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, प्रवेश निर्गम उतारा संबंधीत ▸▸ पुढील पानावर

# मराठा आंदोलनासाठी रॅलीचे आयोजन

**नाशिक । वृत्तसंस्था**

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी उभ्या केलेल्या लढ्यामध्ये नाशिक जिल्ह्यातून लाखो समाज बांधव २४ जानेवारीस कार व मोटारसायकल रॅलीने पुणे जिल्ह्यातून पिंपरी चिंचवड येथून सहभागी होणार असल्याची माहिती मराठा नेते यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी नाशिक जिल्ह्यातील सर्व आंदोलक समर्थक २४ रोजी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ जमल्यानंतर मुंबईच्या दिशेने रवाना न होता पुण्याच्या दिशेने रवाना होतील. त्याच दिवशी साधारणपणे दुपारी दोन वाजेच्या दरम्यान पिंपरी चिंचवड या ठिकाणी मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करून त्या आंदोलन मोर्चात सहभागी होतील व त्यानंतर जरांगे पाटील यांच्यासह इतर समाज बांधव लोणावळा मार्गे मुंबईकडे रवाना होतील. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून अंदाजे प्रत्येकी एक ट्रक याप्रमाणे तांदूळ, डाळ, तेल, शेंगदाणे व मसाल्याचे पदार्थ याप्रमाणे साहित्य स्वयंस्फूर्तीने जमा केले आहे. ते सर्व साहित्य मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनासाठी येणाऱ्या समाज बांधवांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. ज्या तालुक्यातून ते साहित्य जमा झाले आहे त्या तालुक्यातील समाज बांधवांनी त्यांची एक समिती निर्माण करून ते सर्व साहित्य ट्रकमध्ये भरून आंदोलन स्थळापर्यंत नेण्याची व त्या ठिकाणी जेवणाची व्यवस्था करणाऱ्या समाज बांधवांना ते सोपवण्याची जबाबदारी घेतलेली आहे.

# शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाई द्या -उच्च न्यायालय



**मुंबई । वृत्तसंस्था**

अटल सेतूसाठीचं भूसंपादन बेकायदा, पण लोकोपयोगी प्रकल्पाला हानी पोहचवता येणार नाही, असं हायकोर्टाने म्हटलं आहेत. नव्या भूसंपादन कायद्यानुसार शेतकऱ्यांना वाढीव नुकसानभरपाई द्या, असे निर्देशही हायकोर्टाने दिले आहेत. शिवडी- न्हावा शेवा दरम्यान उभारलेल्या 'अटल सेतू'साठी केलेलं भूसंपादन बेकायदेशीर असल्याचं निरीक्षण नोंदवत, हे भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना नव्या कायद्यानुसार वाढीव नुकसान भरपाई देण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. सार्वजनिक हितासाठी असलेल्या प्रकल्पाचं नुकसान होऊ नये, मात्र ते टाळताना प्रकल्पग्रस्तांचंही नुकसान होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. घेतलेली जमीन आता परत करता येणार नाही, त्यामुळे त्यांना साल २०१३ च्या कायद्यानुसार बाजारभावानं जमिनीचे दर देण्यात यावेत असे निर्देश न्यायमूर्ती बी.पी. कुलाबावाला आणि न्यायमूर्ती एम. एम. साठ्ये यांच्या खंडपीठानं नोंदवलं आहे. हा प्रकल्प मुंबई व नवी मुंबईला जोडणारा आहे. मुंबईच्या वाशी प्रवेशद्वारावरील वाहतूक कोंडी सोडविण्याच्यासाठी हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. त्यामुळे नवी मुंबईचा विकासही होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी करण्यात आलेली भूसंपादन प्रक्रिया ठरावीक वेळत पूर्ण झाली नाही, असे आम्ही म्हटले तर प्रकल्पाला हानी पोहोचेल, असही यावेळी हायकोर्टानं स्पष्ट रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील जासई गावातील ७ हेक्टर ५१ गुंठे जमिनीचं भूसंपादन करण्याबाबत राज्य ▸▸ पुढील पानावर




## संपादकीय

# शेतकऱ्यांचे जगणे, जटील प्रश्न?

आजच्या किमतीत शेतमालाची विक्री करने शेतकऱ्याला न परवडणारी आहे. दिवसेंदिवस रासायनिक खतांचे भाव, बी बियाणे- कीटकनाशके व मजुरीचे दर, सतत वाढत राहील्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढविणे, ही कठीण समस्या तयार झाली. हमी भावापेक्षा कमी भावात विक्री होऊ नये अशी केंद्र सरकारने व्यवस्था कां केली नाही ? सर्रास हमीभावाच्या खाली शेतमाल विकल्या जात आहेत. वास्तविक हमीभाव म्हणजे कमीभाव आहेत . आम्हीच बेअक्कल शेतकरी आमदार- खासदार, मंत्र्यांना डोक्यावर घेऊन नाचत आहोत. त्यांचे हार तुरे घालून सत्कार करत आहोत. राज्य व केंद्र सरकारने त्यांना निवडणुकीच्या खर्चासाठी (कमिशन खाण्यासाठी ) विकास कामाच्या नावाने दिलेला तो निधी असतो. राजनीतीसाठी शहरे खुष ठेवण्यासाठी, सरकार शेतकऱ्यांचा बळी घेत आहे. म्हणूनच शेतकऱ्यांच्या जगण्यासाठी शेतीमालाचा भाव,ही एक गंभीर समस्या देश पातळीवर तयार झाली. अयोध्येत राम, शेतात गळतो घाम, अन् भीक नको, घेऊ घामाचे दाम. शेतकऱ्याचे पंचप्राण शरद जोशी म्हणायचे, -- कुत्र्याचे शेपूट सरळ होईल, पण शेतकरी एकत्र येणार नाहीत. शेतमालाच्या भाव वाढीची मागणी करणे ही केंद्र व राज्य शासनाच्या नजरेत कोर्टाच्या व्यवस्थेत अन् जीवनाशक वस्तूच्या कायद्यात तो गुन्हा आहे. शेतकरी हाच गुन्हेगार ठरतो.तरीपण आंदोलने करण्यासाठी मागील काळात लाखांनी शेतकरी रस्त्यावर उतरला,आणि अन्नधान्य उत्पादनात आघाडीवर राहिला , पण सरकारचे भूत डोक्यावर बसेल हे त्याला माहिती नव्हते. शेतीमालाचा भावाचा प्रश्न हा रस्त्यावरचा नाही.अन् तो आंदोलनाचा ही नाही. जनतेतून एक नेता तयार होतो. असेच आतापर्यंत टोपल्याने नेते तयार झालेत,७ सोयाबीन, कापूस, तूरीचे भाव दहा - बारा वर्षात खाली आलेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक धोरणाचा प्रश्न केंद्रातील सत्तेच्या विचाराधीन असलेला विषय आहे. हे प्रश्न पंढरीत पांडुरंग किंवा अयोध्येत राम सोडवणार आहे काय ? जोपर्यंत शेतमाल हा जागतिक बाजारपेठेत जाणार नाही, तोपर्यंत शेतीमालाचे भाव वाढणार नाही . आणि त्यासाठी आयात- निर्यात धोरणे मुक्त असावी . ज्याप्रमाणे केंद्र सरकारने कापूस राज्यबंदी हटविल्यामुळे शेतमाल प्रत्येक राज्यात जाऊ लागला. तसेच केंद्र सरकारने देश पातळीवरील निर्यात बंदी उठवावी व शेतमाल निर्यात होऊन अमेरिका, युरोप, जपान, ब्रह्मदेश, चीन, पाकिस्तान मध्ये गेला तर शेतकऱ्याला शेतीमालाचे भाव वाढवून मागण्याची गरज पडणार नाही. आतापर्यंत आंदोलनात शेतकऱ्यांनी अश्रूधूराच्या नळकांड्या, गोळीबार, लाठीहल्ला, हे सर्व काही सहन केलं परंतु शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटला नाही. अन् तो सत्ताधीशांना सोडवायचा सुद्धा नाही. कारण सरकारला राजनितीच्या गरजेसाठी पिकवणाऱ्या पेक्षा खाणाऱ्याची जास्त काळजी पडली आहे. देशातील मतदान हे खाणाऱ्या वर अवलंबून आहे. शेतीमालाला भाव न देता, शासकीय स्वस्त दवाखाने, गावागावात स्वस्त मालाचे धान्य दुकाने लावून शेतकऱ्यांची बेइज्जती केली. ज्या गावात शेतमाल पिकतो त्याच गावात स्वस्तच असतो,मग स्वस्त धान्याचे दुकान लावण्याची गरज काय ? परंतु सरकारने अजून २/- किलो धान्य व ५००/- महिन्याचे अनुदान देऊन, शेतमजूर आळशी बनविला व शेतकऱ्यांची क्रूर थट्टा केली. आमदार, खासदारांनी, मंत्र्यांनी, मोर्चे काढून तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिली. मग कर्मचाऱ्यांना निवेदने देऊन प्रश्न सुटणार आहे कां ? ते फक्त निवेदने स्वीकारून राज्य व केंद्राला पाठवतात. मग ही गोष्ट राज्य व केंद्राला माहित नाही का ? म्हणजेच हा शेतकऱ्याला चुत्या बनवण्याचा फंडा राज्यकर्त्यांनी वापरला. अन अशा चुत्यागिरीला समाज बळी पडला. म्हणजे जत्रेतला हा सुद्धा एक तमाशा आहे. यापुढे शेतकरी, शेतमजुरांनी अशा मोर्चात सामील होऊन राजकीय पक्षाची फक्त दुकानदारी वाढवू नये. अशा मोर्चात सामील होऊन कधीही शेतमालाचे भाव वाढणार नाहीत ,तर त्यासाठी निर्यात बंदी हटवावी लागेल. जाती, धर्माचे प्रश्नन सोडवण्यापेक्षा आर्थिक धोरनाचे प्रश्न सोडविले तर नक्कीच समाज परिवर्तन होईल, असे चर्चासत्रात श्री धनंजय पाटील काकडे यांनी सांगितले . शरद जोशी म्हणायचे- सरकारचे धोरण, हेच शेतकऱ्यांचे मरण. विद्यमान आमदार, खासदार सरकार चालवीतात तर मग हेच खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. शेतकरी आत्महत्येला तेच जबाबदार आहेत. राजकीय पक्षांचे अनेक निरर्थक विचार डोक्यात घालून( मंदिर, मज्जित, जाती, धर्म , मराठा- ओबीसी हे फक्त निवडणुकीपुरते विषय असतात.) शेतकऱ्यांचा सत्यानाश केला. आतापर्यंत आमदार, खासदार, मंत्र्यांनी, ग्रामगीता प्रचारक आणि कवी, लेखकांनी फक्त शेतकरी दुःखाचा ढोंगाचा पसारा स्टेजवर मांडला. कितीही दुःखाची कवीता गायिली , छान हिशोबाचे लेख लिहिले, तरी सरकारला काही फरक पडत नाही ? शेतकरी आत्महत्येची कारणे आता जनतेच्या लक्षात येत आहे. आयात- निर्यात धोरणामुळे शेतकरी संपवीले जात आहे. गेल्या ७५ वर्षात जी काँग्रेसने धोरणे राबवली तीच भाजपा सरकारने राबवली. जोपर्यंत शेतकरी विरोधी कायदे हे बदलत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांची आत्महत्या सतत वाढणार . मतदाराने आतापर्यंत घराणेशाहीला निवडून पाठविले आमदार- खासदारांनी राजकीय पक्षाची गुलामी व लाचारी स्वीकारली. त्यासाठी शेतकरी संघटनेचे किंवा शेतकरी आर्थिक धोरणाचे विचारवंत आमदार - खासदार निवडून आणणे हेच आता आवश्यक आहे. ज्यांनी आतापर्यंत भ्रष्टाचार केला तेच भ्रष्टाचारी माणसे जर निवडून पाठविले तर पुन्हा भ्रष्टाचार वाढनार आहे, म्हणजेच जो उमेदवार खर्च करणार नाही त्याला निवडून पाठवावे लागेल. राजकारणात बदल झाल्याशिवाय ही व्यवस्था दुरुस्त होणे शक्य नाही. विधान भवन संसद मध्ये आवाज उठणारी आमदार- खासदार नसल्यामुळे ही वस्तुस्थिती आहे. आजचे आमदार- खासदार हे फक्त नापिकी, अस्मानी संकटेया विषयावर बोलतात व निधी मागतात. परंतु शेतमालाचे भाववाढ होण्यासाठी कोणीही बोलत नाही. गेल्या दहा वर्षात सोयाबीनचे भाव सतत तेच ४५०० आहे व सोयाबीन तेलाचे भाव तिप्पट वाढलेत ही वस्तुस्थिती आहे. सरकार औद्योगिक उत्पादित वस्तूचे भाव वाढविते व शेतमालाचे भाव तेच ते स्थिर ठेवते . आवाज उठवीणाऱ्या शेतकरी नेत्यावर कोर्ट केसेस दाखल करते. मागे ३० डिसेंबर २०२३ नाशिक, १ जानेवारी २०२४ पुणे व ६ जाने. २०२४ अमरावती येथे शेतकरी संघर्ष समिती व शेतकरी- वारकरी कष्टकरी महासंघाच्या वतीने सरकारची निर्यात बंदी अन् शेतकऱ्यांची मार्केट बंदी या विषयावर चर्चासत्र झाले. शेतमालाची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीत न करता बाहेर व्यापार पेठेत शेतकऱ्यांनी आपल्या गरजेनुसार करावी. केंद्र सरकारने आयात करून शेतीमालाचे भाव पाडलेत म्हणून निर्यात बंदी उठेपर्यंत शेतकऱ्यांनी अहिंसा व शांततेने चालणाऱ्या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे यांनी जाहीर केले. शरद जोशी म्हणायचे - कृषी उत्पन्न बाजार समिती हे शेतकऱ्यांचे कत्तलखाने आहेत. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आर्थिक धोरणे व्यवस्थित न राबविल्यामुळे आजी- माजी आमदार - खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान जबाबदार आहेत. पुन्हा आता निवडणुकीच्या दौऱ्यात आम्हीच तुमचे तारणहार आहोत,असे हे सांगतील. आता हे तुमच्या कष्टाच्या तिजोऱ्या लुटलेल्या तुम्हालाच वाटणार आहेत. त्यासाठी आता एकच पर्याय आजी - माजी आमदार- खासदारांना गावबंदी हाच एक पर्याय आहे. विचार बदला, आत्महत्या टाळा.

# राज्यातील दहा विद्यार्थिनींना न्यूयॉर्कमध्ये मिळणार शिष्यवृत्ती



**मुंबई । वृत्तसंस्था**

महिलांचे सबलीकरण व्हावे, त्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी तसेच आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात खंड पडू नये म्हणून न्यूयॉर्क येथील बरो ऑफ मॅनहॅटन कम्युनिटी कॉलेज (बीएमसीसी) या समुदाय महाविद्यालयाने सन २०२४ मध्ये महाराष्ट्रातील दहा विद्यार्थिनींना इयत्ता बारावी नंतरच्या पदवी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले आहे. या शिष्यवृत्तीमुळे महाराष्ट्रातील दहा विद्यार्थिनींना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी न्यूयॉर्क स्थित या महाविद्यालयात प्रवेश मिळणार आहे. या शिष्यवृत्तीच्या रूपाने महाराष्ट्रातील विद्यार्थिनींना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची कवाडे खुली होणार असल्याची माहिती शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील पत्रकार कक्षात बुधवारी त्यांनी ही माहिती दिली. या संधीप्रमाणे आणखी एक अशाच प्रकारची संधी जर्मनी मधील शैक्षणिक संस्थेतही उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील असल्याचेही केसरकर यांनी नमूद केले. यावेळी बरो ऑफ मॅनहॅटन कम्युनिटी कॉलेज (बीएमसीसी)चे उपाध्यक्ष डॉ. संजय रामदथ, महानगरपालिकेच्या नियोजन विभागाच्या संचालिका डॉ. प्राची जांभेकर, शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, शिक्षणाधिकारी राजू तडवी उपस्थित होते. न्यू यॉर्क (अमेरिका) येथील बरो ऑफ मॅनहॅटन कम्युनिटी कॉलेज (बीएमसीसी) या समुदाय महाविद्यालयाशी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने केलेल्या सामंजस्य करारानुसार ही शिष्यवृत्ती ऑगस्ट २०२४ पासून देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी इच्छुक विद्यार्थिनींनी मुंबईतील जुहू स्थित श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी) येथे संपर्क करावा. अधिक माहितीसाठी विद्यार्थिनींनी www.bmcc.cuny.edu/apply या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन डॉ. रामदथ यांनी केले. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींचा पहिल्या वर्षासाठीच्या ट्युशन खर्च सदर महाविद्यालय उचलणार आहे. त्यामुळे विद्यार्थिनींवर कोणताही आर्थिक भार न येता त्यांचे शिक्षण सुरू राहणार आहे. या अभ्यासक्रमादरम्यान शिष्यवृत्तीप्राप्त दहा विद्यार्थिनींना राहण्याच्या खर्चातही सवलत देण्यात येणार आहे.

## पान १ वरून....

### आम्ही लढून

म्हणाले आहेत. मनोज जरांगे म्हणाले की,आम्ही २० जानेवारीला मुंबईला निघणारच, आम्हाला मुंबईला जाण्याची हौस नाही. मुंबईमध्ये सुद्धा आमचेच बांधव असून, त्यांनी होणारा त्रास काही दिवस सहन करावा. विनाकारण मुंबईला त्रास देण्याचे काम सरकारच करत आहे. हे सर्व सरकार हाताने मुद्दाम करत आहे. सरकारमधील काही लोकांचा विरोध असून, ते अंधारातून विरोध करत आहेत. त्यांची नावे देखील जाहीर करणार आहोत. त्यामुळे, समाजाच्या विरोधात जाऊन पापाचे धनी होऊ नका. यांना गोरगरीब मराठ्यांची पोरं मोठी होऊ द्यायची नाहीत. त्यामुळे षडयंत्र रचले जात आहे. धोका झाला तरी भीतोय कोण ?, नोटीसा देऊन काही होणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

### कुणबी जात प्रमाणपत्र

शाळेतून तर खासरा पत्रक, क पत्रक, पाहणी पत्रक, कुळ नोंदवही इत्यादी अभिलेखांतील आवश्यक नोंदीच्या प्रमाणित प्रती संबंधित तहसिल कार्यालयातून विहित शुल्क भरणा करुन प्राप्त करुन घ्याव्यात, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने केले आहे.

### शेतकऱ्यांना वाढीव

सरकारनं साल २०१२ मध्ये जाहीर केलं होतं. त्यानंतर २२ डिसेंबर २०१५ रोजी अॅवॉर्डकाढण्यात आले. तोपर्यंत भूसंपादनासंदर्भातील २०१३ चा नवा कायदा अस्तित्वात आला तरीही, राज्य सरकारनं साल १८९४ च्या जुन्या कायद्यानुसारच हे भूसंपादन केलं. त्याविरोधात जासई गावातील २५ शेतकऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. साल १८९४ चा कायदाच संपुष्टात आल्यानंतरही त्या कायद्यांतर्गत भूसंपादन केलं गेलं. कारण, राज्य सरकारला नव्या कायद्यानुसार, शेतकऱ्यांना बाजारभावानं जमीन शुल्क द्यायचं नव्हते, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्यावतीनं न्यायालयात केला गेला होता.

# रामराजे-उदयनराजे यांच्यामधील वाद मिटला



**सातारा । वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाचे राज्यसभा खासदार उदयनराजे भोसले यांनी विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांची फलटण येथील लक्ष्मीविलास पॅलेस निवासस्थानी अचानक भेट घेऊन सुमारे अर्धा तास बंद दाराआड चर्चा केली. त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी आयोजित केलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्रमास येऊन रामराजेंची भेट घेतल्यामुळे माढा आणि सातारा लोकसभा निवडणुकीत रामराजे केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट झाले आहे. विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर आणि राज्यसभेचे खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्यातील वाद सर्वश्रुत होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून या दोघा जणांची जवळीक वाढल्याचे चित्र दिसत असून ही जवळीक कुणाला मारक ठरणार असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये उपस्थित होत आहे. उदयनराजेंनी राष्ट्रवादीला रामराम करेपर्यंत दोन्ही राजेंमध्ये झालेल्या टोकाच्या वादांचा साक्षीदार उभा महाराष्ट्र आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून दोघांमधील मतभेद संपल्याचं चित्र आहे. पुण्यातील एका विवाह सोहळ्यात उदयनराजे भोसले आणि रामराजे नाईक निंबाळकर समोरासमोर आले. ही भेट साधीसुधी नव्हती, तर दोघांनी चक्क गळाभेट घेतली. काही महिन्यांपूर्वी सातारा शासकीय विश्रामगृहात आणि आता आज झालेल्या भेटीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी रामराजे नाईक निंबाळकर आणि छत्रपती उदयनराजे भोसले यांच्यातील वाद विकोपाला गेला होता. राष्ट्रवादीमध्ये असणारे उदयनराजे अचानक खासदारकीचा राजीनामा देऊन भाजपमध्ये गेले. दोघांमधील वाद इतका ताणला गेला होता की वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र दोघांमधील वाद सोडवण्यात यश आले नव्हते. या दोघांमधील वाद सातारा जिल्ह्याने वेळोवेळी पाहिला आहे. आज माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये यशवंतराव चव्हाण हायस्कूलच्या पटांगणावर वचनपूर्ती मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यासाठी खासदार उदयनराजे भोसले उपस्थित होते. मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर उदयनराजे यांचा ताफा थेट रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या लक्ष्मीविलास पॅलेसवर दाखल झाला आणि रामराजेंच्या निवासस्थानी उदयनराजे यांनी अचानकपणे भेट घेऊन सुमारे अर्धा तास बंद दाराआड चर्चा केली. तत्पूर्वी या दोघा जणांनी एकमेकांना नमस्कार करून अदबीने विचारपूस केली. स्मित हास्य करीत फोटोसाठी पोज सुद्धा दिली. मात्र बंद दाराआड काय चर्चा झाली हे समजू शकले नाही. मात्र गेल्या काही दिवसांपासून या दोघा जणांची जवळीक वाढल्याचे चित्र दिसत असून ही जवळीक कुणाला मारक ठरणार असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये उपस्थित होत आहे.

## जाहिर प्रगटन

**मा.श्री.संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ५०/२०२४**

**अर्जदार - १) देवानंद प्रभाकर कदम, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. मांडवखेल, बीड, ता.जि.बीड, २) सचिन प्रभाकर कदम, वय ३७ वर्ष, धंदा मजुरी, रा. मांडवखेल, बीड, ता.जि.बीड, ह.मु. जयभवानी नगर, मानपाडा, ठाणे, ३) निलेश प्रभाकर कदम, वय ३२ वर्ष, धंदा मजुरी, रा. मांडवखेल, बीड, ता.जि.बीड, ह.मु. ७०२, बिल्डींग नं.२, आनंदलक्ष्मी, कर्मवीर नगर, ठाणे, ४) किस्कींदा बाळासाहेब कुरूंद, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. डोंगरेवाडी, ता.वाशी, जि. उस्मानाबाद.**

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

ज्याअर्थी **नामे प्रभाकर शामराव कदम** हे दि. १२/१२/२०२३ रोजी **मांडवखेल, ता.जि.बीड** येथे मयत असून अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. तर अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांना हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**आज दिनांक १७/०१/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**
**पुढील तारीख २१/०२/२०२४**
**क.लिपीक**

कोर्टाचा शिक्का

मार्फत
अॅड.शिंदे

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड.

# गारपीटमुळे झालेले नुकसान, मिळणार वाढीव दराने नुकसान भरपाई

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

नोव्हेंबर २०२३ मधील अवेळी पाऊस, गारपीट यांसह नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर वाढीव दराने नुकसान भरपाई देण्याकरिता विभागातील सर्व जिल्ह्यांनी येत्या तीन दिवसात माहिती पाठविण्याचे निर्देश, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांना दिले. जमीन महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या तसेच वाळू डेपो कार्यान्वित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली आज विविध विषयांवर आढावा बैठक झाली. राज्यात २६ ते २८ नोव्हेंबर २०२३ दरम्यान व पुढील कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यासह नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता बाधित शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी शासनपत्र प्राप्त झाले होते. याप्रमाणे नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांकडून प्राप्त माहितीनुसार एकूण ५५,१५७.४३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४६४.८५१ लक्ष निधीची मागणी अहवाल सादर केला होता. पुढे १९ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर वाढीव मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार १ जानेवारी २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. यास अनुसरुन विभागातील सर्व जिल्ह्यांनी येत्या १९ जानेवारी पर्यंत नव्याने माहिती पाठविण्याचे निर्देश श्रीमती बिदरी यांनी दिले. जमीन महसूल वसुलीबाबत बैठकीत माहिती घेण्यात आली. विभागात ठरवून दिलेले ८२५ कोटींचे उद्दिष्ट जमीन महसूल व गौण खनीजाच्या माध्यमातून पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महसूल विभागातील यंत्रणांनी जोमाने कामाला लागावे तसेच उद्दिष्टपुर्तीची दखल जिल्हाधिकारी ते तलाठीपर्यंतच्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गोपनिय अहवालामध्ये घेण्यात येणार असल्याचेही श्रीमती बिदरी यांनी स्पष्ट केले. राज्य शासनाने मागील वर्षी वाळू धोरण जाहीर केले असून विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये वाळू डेपो कार्यान्वित करण्याकरिता राज्य शासनाची पर्यावरण मंजुरी अंतिम टप्प्यात आहे. वाळू डेपोच्या ठिकाणी वेव्हींग ब्रिज उभारण्यासह उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करुन सर्व जिल्ह्यांनी येत्या २६ जानेवारी पासून वाळू डेपो कार्यान्वित करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या. ई-चावडी सॉफ्टवेअरमध्ये निर्देशित २१ गाव नमुन्यांची १०० टक्के नोंद पूर्ण करुन विभागातील ८६९६ गावांमधील वसूलीचे उद्दिष्ट साध्य करण्याचे निर्देशही यावेळी श्रीमती बिदरी यांनी दिले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्पासाठी विभागात एकूण २७७ उपकेंद्र उभारण्यात येत आहेत. यापैकी १८६ उपकेंद्रासाठी शासकीय जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे. तर ४८ उपकेंद्रासाठी अंशत: जमीन उपलब्ध झाली आहे. उर्वरित ४३ उपकेंद्रांसाठी खाजगी मालकीची जमीन महावितरण कंपनीला उपलब्ध करुन देण्यास आवश्यक मदत देण्याच्या सूचना श्रीमती बिदरी यांनी दिल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# राज्यात महायुतीचा महाघोटाळा

**मुंबई । वृत्तसंस्था**

राज्यातील महायुती सरकारवर शिवसेनेकडून सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप केले जात आहेत. शिवसेना आमदार आदित्य ठाकरेंनी मुंबई महापालिकेची एफडी मोडल्यावरुन आणि मुंबईतील विविध रस्ते व पायाभूत सुविधांच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप महायुती सरकावर केला आहे. आता, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही पत्रकार परिषदेतून महायुती सरकारवर भ्रष्टाचार व घोटाळ्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे आरोग्य सुविधांच्या निविदांमध्ये हा घोटाळा होत असून ८०० कोटी रुपयांच्या खरेदीसाठी ८००० कोटींची निविदा काढली जात असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. राज्यात अँम्ब्युलन्स घोटाळा उघड झाला असून अँम्ब्युलन्स पुरवठ्याचे टेंडर सरकारने रद्द करावे, दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करावे, या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले, ॲम्ब्युलन्समधून पैसे खाण्याचा नवा धंदा सरकारमधील काही मंडळींनी सुरू केला आहे. सनदी अधिकाऱ्यांना 'बदली'ची भीती दाखवून साडेतीन-चार हजार कोटींचे टेंडर ८ हजार कोटीपर्यंत फुगवल्याचे उघड झाले आहे. ४ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयानुसार सरकार १,५२९ अँम्ब्युलन्स खरेदी करणार आहे. साधारणपणे एका कार्डिएक सुविधा असलेल्या एका अँम्ब्युलन्सची किंमत ५० लाखाच्या आसपास असते. १,५२९ अँम्ब्युलन्सचे प्रति अँम्ब्युलन्स ५० लाख या प्रमाणे एकूण ७६४ कोटी ५० लाख रूपये होतात. जवळपास ८०० कोटी रूपयात होणाऱ्या या कामावर हे सरकार ८ हजार कोटी खर्च करणार आहे. सनदी अधिकाऱ्यांनी १० दिवसांचेच टेंडर काढण्याचा जो निर्णय घेतला. तो या सनदी अधिकाऱ्यांनी कुणाच्या दबावाखाली आणि का घेतला, असा प्रश्न याप्रकरणी उपस्थित होतो. या टेंडरप्रमाणे नव्या ठेकेदाराला दर महिन्याला ७४ कोटी रूपये देण्याची सरकारची तयारी आहे. अशी रक्कम ठेकेदाराला दर महिन्याला १० वर्षापर्यंत देण्यात येणार आहे. या प्रकाराचा ठेका हा महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच देण्याचा पराक्रम या सरकारने केला आहे. यामध्ये प्रतिवर्षी ८ टक्के वाढ असल्याने १० वर्षांत सरकारच्या तिजोरीतून ८ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कम ठेकेदाराला देण्यात येणार आहे. आमच्या सरकारच्या काळात टेंडरची मुदत ४१ दिवसाची होती. मात्र, या सरकारने हे सर्व नियम पायदळी तुडवले आहेत, असेही वडेट्टीवार यांनी म्हटले. या आगोदर पाच वर्षांसाठी कंत्राट दिले जात होते. यामध्ये दरवर्षी नुतनीकरण केले जात होते. आता मात्र १० वर्षांसाठी कंत्राट दिले जाणार असून यामध्ये दरवर्षी नुतनीकरण करण्याची अट ठेवलेली नाही. हे मात्र गंभीर आहे. राज्यात समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे यावर मोठ्या प्रमाणात अपघात होतात. या अपघातातील लोकांचा जीव वाचविण्यासाठी एअर अँम्बुलन्सची गरज असताना या टेंडरमध्ये मात्र एअर अँम्ब्युलन्सची कोणतीही तरतूद केली नाही. या अँम्बुलन्स शासनाने खरेदी करून सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना द्यायला हव्या होत्या. जेणेकरून सर्वसामान्यांना सेवा आणि बेरोजगारांच्या हाताला कायमस्वरूपी काम मिळाले असते. क्षमता, गुणवत्ता न तपासता आंदण म्हणून कंत्राटदारांना निविदेत घोळ करून कंत्राट दिले जात आहे. त्यामुळे या घोटाळ्याची माहिती सीबीआयला देणार असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

## परभणीत कडाक्याची थंडी

**परभणी । वृत्तसंस्था**

शहर परिसरात दोन दिवसांपासून किमान तापमानामध्ये सातत्याने घट होत आहे. यामध्ये सोमवारी पारा १०.५ अंश सेल्सिअस होता तर मंगळवारी हेच तापमान दहा अंशाखाली आले होते. किमान तापमान मंगळवारी ९ अंश सेल्सिअस नोंद झाल्याने परभणीकरांना चांगलीच हुडहुडी जाणवली. यंदा जानेवारी महिन्यात पहिल्यांदाच मंगळवारी किमान तापमान दहा अंशाच्या खाली आले. शहर परिसरात किमान ९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्याची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ग्रामीण कृषी मोसम सेवा केंद्राने घेतली आहे. मागील आठवड्याभरात सातत्याने किमान तापमानामध्ये घट झाली. दोन दिवसापासून शहर परिसरातील कमी होणाऱ्या तापमानामुळे विविध प्रकारच्या जनजीवनावर परिणाम झाल्याचे दिसून आले. सकाळच्या वेळी वसंतराव नाईक मराठा कृषी विद्यापीठ, राजगोपालचारी उद्यान आणि शहरात मुख्य रस्त्यावर मॉर्निंग वॉक, व्यायामासाठीची वर्दळ कमी झाल्याचे दिसून आले. आरोग्याच्या समस्या जाणवण्यास सुरुवात झाली आहे. मागील वर्षी याच दिवशी किमान तापमान १२.५ अंश सेल्सिअस नोंद झाले होते तर परभणी शहरात आयएमडी नोंदीनुसार मंगळवारचे किमान तापमान हे १३.५ अंश सेल्सिअस होते. त्यामुळे आयएमडी पेक्षा शहर परिसरातील विद्यापीठाच्या नोंदीमध्ये किमान साडेचार अंश सेल्सिअस तापमानाची घट असल्याचे दिसून आले. विद्यापीठ परिसर हिरवळीने नटला आहे. तेथील नोंद आणि शहरात होणारी आयएमडीची नोंद यात नेहमीच हा फरक जाणवतो.

## मराठवाड्यात हवामान कोरडे राहणार

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. वायव्य भारतात मागील २४ तासांपासून किमान तापमान वाढले असून पूर्व भारतात २ ते ३ अंशांची घट झाली आहे. उर्वरित देशात तापमानात फारसा फरक नसल्याचे भारतीय हवामान विभागाने सांगितले. दरम्यान मराठवाडयात पुढील दोन दिवसात किमान तापमानात किंचित घट होऊन त्यानंतर किमान तापमानात हळूहळू १ ते २ अं.से. ने वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील दोन ते तीन दिवसात कमाल तापमानात फारशी तफावत जाणवणार नाही व त्यानंतर कमाल तापमानात हळूहळू १ ते २ अं.से. ने वाढ होण्याची शक्यता आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषी हवामान आधारीत कृषी सल्ल्याची शिफारश केली आहे. कुठल्याही परिस्थितीत कापसाची फरदड (खोडवा) घेऊ नये. कापूस पिकाची शेवटची वेचणी पूर्ण झाल्यावर कापूस पिकाचा पालापाचोळा, पराट्या जमा करून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. काढणी केलेल्या तूरीची वाळल्यानंतर मळणी करून सूरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. रब्बी ज्वारी पिकास फुलोरा येण्याच्या अवस्थेत (पेरणी नंतर ७० ते ७५ दिवस) व कणसात दाणे भरण्याच्या अवस्थेत (पेरणी नंतर ९० ते ९५ दिवस) पाणी द्यावे. गहू पिकास कांडी धरण्याच्या अवस्थेत (पेरणी नंतर ४० ते ४५ दिवस) व पिक फुलावर असतांना (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवस) पाणी द्यावे. उन्हाळी भुईमूग पिकाच्या पेरणीसाठी पूर्वमशागतीची कामे केली नसल्यास लवकरात लवकर करून घ्यावीत. उन्हाळी भुईमूग पिकाची पेरणी १५ जानेवारी ते ८ फेब्रुवारी दरम्यान करता येते. दिवसाचे तापमान वाढल्याने द्राक्षांची पाण्याची गरज वाढणार आहे. मण्यांच्या विकासाचा टप्पा व तापमान लक्षात घेता मल्चचा वापर करावा तसेच बागेत संध्याकाळी किंवा सकाळी पाणी द्यावे. भाजीपाला पिकात अंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे. भाजीपाला पिकात आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची काढणी करून घ्यावी. टोमॅटो पिकावरील करपा याच्या व्यवस्थापनासाठी झोऑक्सीस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% एससी १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. काकडीवर्गीय भाजीपाला पिकात डाउनी मिल्डयू चा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी अझोऑक्सीस्ट्रोबिन २३% एससी २.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## महाराष्ट्रात पराभव दिसू लागल्याने भाजपाकडून विरोधी नेत्यांना प्रलोभने

**मुंबई । वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाची परिस्थिती अत्यंत वाईट झाली असून राज्यातून व केंद्रातूनही सत्तेच्या बाहेर जाण्याची वेळ आली आहे. १० वर्षात केवळ घोषणाबाजी, जाहिरात बाजी आणि खोटेपणा करून सत्ता चालवली. जनतेला आता भाजपाचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे आहेत हे दिसले आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे ४० पेक्षा जास्त खासदार निवडून येतील, असे भाजपाच्याच सर्वेत दिसून आल्याने दुसऱ्या पक्षातील नेत्यांना प्रलोभने देऊन भाजपात खेचण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जात आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने स्पष्ट केले. भाजपाच्या पायाखालची जमीन सरकलेली आहे, त्यांना पराभव दिसू लागला आहे, महाराष्ट्रातून निवडून कसे यायचे हा त्यांच्यापुढे मोठा प्रश्न आहे. भाजपाकडे विचारसरणी राहिलेली नाही, काहीही करून सत्ता मिळवणे व सत्तेतून जनतेच्या घामाचे पैसे कसे लुटायचे एवढीच त्यांची विचारधारा राहिली आहे, देश विकून देश चालवला जात आहे. काँग्रेसचे लोकनेते भाजपात कसे येतील यासाठी ते प्रयत्न करत असतात. ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीच त्यांना भाजपाने ऑफर दिली होती असे जाहीरपणे सांगितले आणि ते काँग्रेस सोडून जाणार नाहीत हेही स्पष्ट केले आहे. भाजपाला सत्तेचा मोह किती झाला आहे याचे दर्शन यातून होते. भाजपाकडे नेते नाहीत व उमेदवारही नाहीत, त्यांच्या पक्षात काँग्रेस व इतर पक्षातीलच अनेक नेते आहेत. भाजपाचे सध्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हेसुद्धा युवक काँग्रेसमध्ये होते. देवरा कुटुंब ५० वर्षापेक्षा जास्त काळ काँग्रेसमध्ये होते, विविध पदे भूषवली, खासदार झाले, मंत्री झाले त्यावेळी त्यांना काँग्रेस नकारात्मक आहे असे वाटले नाही आत्ताच कसे वाटू लागले. देवरा म्हणतात विकासासाठी शिंदेसेनेत गेलो पण त्यांचा व्यक्तिगत विकास थांबला होता म्हणून ते गेले आहेत. काँग्रेस पक्ष व काँग्रेसचे नेतृत्व सकारात्मकच आहे, काँग्रेससाठी देश प्रथम आहे. फिल्मफेअर पुरस्कार सोहळा यावेळी गुजरातमध्ये होत आहे, जेव्हा जव्हा नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले तेव्हा तेव्हा ते महाराष्ट्रातून काही ना काही गुजरातला घेऊन गेले. ते देशाचे पंतप्रधान आहेत का गुजरातचे? याआधी महाराष्ट्रातील वेदांता-फॉक्सकॉन, टाटा एअरबस, आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र, मुंबईतील हिरे उद्योग गुजरातला घेऊन गेले. काल परवा आले आणि मुंबईतील ग्लॅमर असलेला फिल्म फेअर सोहळाही गुजरातला घेऊन गेले. महाराष्ट्र लुटला जात आहे आणि राज्यातील हस्तक गुजरात लॉबी सांगेल त्याप्रमाणे वागत आहेत हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.

## मुलाचा मृतदेह विहीरीत आढळला

**नगर । वृत्तसंस्था**

शहरातील अगस्ती थेटर गल्ली येथून सोमवारी दुपारी आडीच वाजण्याच्या दरम्यान रूद्र आकाश पवार हा पाच वर्षाचा मुलगा गायब झाला होता. नातेवाईक, अकोलेकर व पोलिसांनी शहर पिंजून काढत शोध घेतला. त्याचा मृतदेह चिरेबंदी परिसरात एका अडगळीतील ७० फूट खोल आडात रात्री उशिरा साडे अकराच्या सुमारास आढळून आला आणि त्याच्या आईवडीलसह नातेवाईकांनी एकच आक्रोश केला.दुपारी जेवण झाल्यानंतर रूद्र खेळायला घरा बहार पडला होता. शहरात संक्रांतीची पतंग उडवण्याची धूम सुरू असताना काही कटलेले पतंग गोळा करण्यासाठी धावपळीत होते. चिमुकला रूद्र पतंग खेळत मुलांसोबत होता. घरी लवकर न आल्याने रूद्रची शोधाशोध सुरू झाली. पोलिसांनी पाच पथके रवाना करून अनेक संशयित बाबी तपासल्या. सोशल मीडियावर देखील पोस्ट व्हायरल करण्यात आले. नदी, नाले, ओढे, गटारी अशी अनेक ठिकाणे पायाखाली घातली व शोधली. मात्र, रात्री ११ वाजले तरी त्याचा शोध लागला नाही.त्यानंतर जी मुले दुपारी पतंग खेळत होती. त्यांचाकडे चौकशी केली आणि काही ठिकाणी सीसीटीव्ही तपासले. त्यानंतर या मुलाचा मागमुस लागला. अंतीमतः सखोल तपास करताना चिरेबंदी वाडा येथील एका ७० फुट आडात संबंधित मुलाचे प्रेत दिसून आले. त्यानंतर त्याची आई आणि वडिलांनी एकच टाहो फोडला. पतंग खेळने चिमुकल्याचा बळी घेतला.संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मराठा आरक्षणासाठी अविरत लढणारे झुंजार नेतृत्व बजगुडे पाटील

बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रात शिवक्रांती संघटनेच्या माध्यमातून युवकांना संघटित करत मराठा आरक्षण, शिवस्मारक, अट्रासिटी यासह विद्यार्थी, शेतकरी, कामगार, इत्यादींच्या प्रश्नांवर आक्रमकपणे लढनारे वेळ प्रसंगी परिणामाची तमा न बाळगता प्रस्थापित सत्ताधाऱ्यांच्या अंगावर जाण्याची धमक मनगटात असलेले मराठवाड्याच्या मातीतील रणझुंजार नेतृत्व शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांचा आज ३९ वा वाढदिवस त्यानिमित्त त्यांना उदंड व निरोगी आयुष्य लाभो व त्यांनी हाती घेतलेले शिवकार्य अखंडित चालत राहो हीच आई जगदंबे चरणी प्रार्थना.. महाराष्ट्रामध्ये अनेक सामाजिक संघटना व समन्वयक मराठा समाजाच्या नावावर राजकारण करत पद,पैसा आणि प्रसिद्धीच्या मागे असलेले आपणास दिसत असले तरी काही बोटावर मोजण्याइतके पुढारी आणि संघटना प्रसिध्दी आणि पैश्याच्या मागे न लागता आपली संपूर्ण हयात समाजाच्या हितासाठी सातत्याने प्रामाणिक काम करत असतात. त्यापैकीच एक म्हणजे शिवक्रांती युवा परिषद व गणेश दादा बजगुडे यांचे कार्य बीड सारख्या जिल्ह्यातून सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत कुठलीही राजकीय सामाजिक पार्श्वभूमी नसताना वयाच्या २५ व्या वर्षी शिवक्रांती युवा परिषद नावाची संघटना स्थापन करून गेली १३ वर्ष अविरतपणे महाराष्ट्रभर तरुणांची हक्काची फळी निर्माण करत शेतकरी, विद्यार्थी कामगार यासह अनेक प्रश्नांवर आक्रमकपणे लढा उभारलेला आहे. मराठा आरक्षण, शिवस्मारक इत्यादी प्रमुख मागण्यांसाठी मराठवाड्यात मराठा जागर अभियानाच्या माध्यमातून २०१७ मध्ये तुळजापूर ते वेरूळ अभियान राबवले त्याच बरोबर मराठा आरक्षणासाठी बीड येथे बी एस एन एल टॉवर वर चढून केलेले आंदोलन असेल किंवा मुंबई आझाद मैदान येथे केलेले आमरण उपोषण यासह मोर्चा, निदर्शने रस्ता रोको इत्यादी अनेक लक्षवेधी आंदोलने त्यांनी छावा आणि शिवक्रांती संघटनेच्या माध्यमातून केलेले आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी काठ्या लाठ्या जेल ही भोगले तरी देखील आपले मराठा समजबद्दलची नाळ व कार्य त्यांनी कधीही थंड होवू दिले नाही. आंदोलने, संघटन बांधणी शाखा उद्घाटन यासोबतच सामाजिक सांस्कृतिक कामात देखील ते नेहमी अग्रेसर असतात आपल्या शिवक्रांती युवा परिषदेच्या माध्यमातून रुग्णवाहिका, आरोग्य शिबीर, पाणपोई, वृक्षारोपण, अन्नदान, किराणा वाटप, धान्य वाटप, इत्यादिसह व्याख्याने महानाट्य पोवाडे यासारखे सांस्कृतिक व समाज प्रबोधनाचे कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा कायम सुरू ठेवणारे कोरोना सारख्या महामारित सगळे जग घरात बसलेले असताना दादा मात्र आहो रात्र रुग्णसेवेत त्याच बरोबर रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान, किराणा, धान्य वाटप करत होते. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना कोरोणा योद्धा पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आले. त्याच बरोबर त्यांना जिजाऊ भुषण, पेठबीड भुषण, क्रांतिसिंह, चंपवतीरत्न, इत्यादी पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. दातृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व या त्रिविणी संगम गुणांमुळे हे नेतृत्व हजारो युवकांच्या गळ्यातील ताईत बनले असून अल्पावधीत आपल्या कार्याची छाप महाराष्ट्रभर निर्माण केलेली आहे. आपल्याकडील कुठल्याही व्यक्तीला रिकाम्या हाती जावू न देणारा प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणारा प्रस्थापितांना ही लाजवेल अशी शरीरयष्टी व राहणीमान असलेले दादा सर्वांचे दादासाहेब झाले परंतु आपल्या प्रत्येक सहकाऱ्यांशी कौटुंबिक नाळ बंधुत्वाचे नाते जोपासत संघटना आणि संघटनेच्या पदाधिकारी यांच्यासाठी कुठल्याही स्थराला जावून काम करणारा व पायात भिंगरी बांधून लोकांच्या सुख दुःखात सहभागी असलेला नेता आपले दुःख झाकुन इतरांच्या मदतीला धावून जाताना स्वतःवर अनेक संकटे आली मान अपमान पचवायला परंतु कधीही माघार घेतली नाही किंवा कोणाच्याही दबावाला भिक घातली नाही. अनेक संकटाना पायदळी तुडवत आव्हानांना संधी समजून आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेत लढणाऱ्या या रणझुंजार नेतृत्वात महाराष्ट्रमहाराष्ट्रपदांक्रत होवो हीच आई जगदंबे चरणी प्रार्थना.. आपणास जन्मदिनाच्या मनःपुर्वक शुभेच्छा






# दुचाकीच्या डिक्कीतून ३ लाख रुपये लंपास

**केज । प्रतिनिधी**

मेडिकलवरून गोळ्या घेईपर्यंत अज्ञात चोरट्याने पाळत ठेवून दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेली ३ लाख रुपयांची रक्कम लंपास केल्याची केज शहरात घडली. एकुरका ( ता. केज ) येथील शेतकरी सर्जेराव एकनाथ केदार ( वय ६० ) हे व त्यांचा मुलगा संदीप केदार हे दोघे बापलेक १७ जानेवारी रोजी सकाळी १०.१५ वाजेच्या दुचाकीवरून केज शहरातील रोजा मोहल्ला भागातील एसबीआय बँकेत पैसे काढण्यासाठी आले होते. त्यांनी बँकेतून एका खात्यावरून २ लाख रुपये व दुसऱ्या खात्यावरून १ लाख रुपये काढले. बँकेच्या बाहेर येऊन त्यांनी ३ लाख रुपयांची दुचाकीच्या डिक्कीत ठेवून ते कानडी चौकातील कांचन मेडिकलवर बीपीच्या गोळ्या घेण्यासाठी आले. गोळ्या घेण्यासाठी मेडिकलवर गेले असता पाठीमागे पाळत ठेवून आलेल्या चोरट्याने डिक्कीची चैन उघडून ३ लाख रुपयांची रक्कम लंपास केली. गोळ्या घेऊन परत आल्यानंतर डिक्कीची चैन उघडली दिसल्याने हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. सर्जेराव केदार यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फौजदार राजेश पाटील हे पुढील तपास करताहेत.

## महिले कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी करणाऱ्या शिक्षकावर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेने केलेल्या निलंबन कारवाईत सहभाग असल्याच्या संशयाने राग मनात धरून आपणास सहा महिन्यापासून त्रास देणाऱ्या शिक्षकाने घराच्या पाठीमागे येऊन विनयभंग केल्याची तक्रार धारूर येथील एका कर्मचारी महिलेने केली. या संदर्भात धारूर पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धारूर तालुक्यातील रमेश नखाते (रा.



आवरगाव ता. धारूर) याने अंजनडोह केंद्राचे तत्कालिन प्रभारी केंद्रप्रमुख असताना २६ लाख रूपयांच्या अपहार प्रकरणी कलम ४२० भादंविनुसार गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी नखाते यास निलंबित केले होते. दरम्यान निलंबनामध्ये सहभाग असल्याचा समज करून नखाते हा मागील सहा महिन्यापासून त्रास देत होता. तसेच ११ जानेवारी रोजी घरापासून काही अंतरावर भेटून शारीरिक सुखाची मागणी करून धमकी दिल्याचे संबंधित कर्मचारी महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार १५ जानेवारी २०२४ रोजी कलम ३५४, ३५४ (ड), ५०४, ५०६, भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बनावट दारूवर धाड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी अपर पोलीस अधीक्षक आंबेजोगाईचा चार्ज घेतलेल्या चेतना तिडके यांनी माहितीच्या आधारे भल्या पहाटे वाणा नदी पात्रात टीमला सोबत घेऊन हातभट्टीवर दारूवर मोठी कारवाई केली. कारवाईत दरम्यान ३७ गुळ मिश्रित फसवते रसायन आंबट व उग्र वास येत असलेले रसायन २०० लिटर प्रति बॅलर प्रमाणे अंदाजे ७४०० लिटर रासायन नष्ट केले. त्याची किंमत प्रति लिटर ३० रुपये प्रमाणे २,२२,००० व ३७ बॅलरचे प्रति बॅलर किंमत १००० प्रमाणे ३७००० असे व तयार हातभट्टीची दारू १५ लिटर प्रति लिटर पन्नास रुपयाप्रमाणे ७५० असे एकूण मिळून २,५९,७५० रुपयांचा मुद्देमाल जागेवर पंचा समक्ष नष्ट केला. हातभट्टीची दारू तयार करणारे पुढील इसमांवर कायदेशीर कारवाई केलेली आहे आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम नुसार कलम ६५ ई, फ नुसार पोस्टे.आंबेजोगाई ग्रामीण ला गुन्हा दाखल केला.

# सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

खामगाव पंढरपूर महामार्ग माजलगाव तेलगाव नादुरुस्त रस्त्याने अनेक बळी घेतले आहेत. त्यामुळे हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्यात यावा.तसेच हिट अँड रन केंद्र शासनाने केलेला कायदा त्वरित रद्द करण्यात यावा या मागण्यासाठी माजलगावात परभणी टी पॉइंट या ठिकाणी बुधवार दि.१७ रोजी सकाळी ११ वाजता सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष यांच्यासह माकप वंचित काँग्रेस शेकाप भाकप यासह ड्रायव्हर संघटनेने सहभाग घेतला. खामगाव पंढरपूर महामार्ग माजलगाव तेलगाव मार्गे काढण्यात आला आहे.परंतु याठिकाणी महामार्गावर अनेक ठिकाणी रस्त्याला भेगा पडल्या आहेत. रस्त्यालगत असणार्या पंख्याची कामेही निकृष्ट झाली आहेत. दोन-तीन वर्षापासून असलेल्या या समस्येमुळे वाहनचालकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. अनेक बळी याठिकाणी गेले आहेत.तर अनेक वाहनचालक या अपघातात अपंग झाले आहेत.या रस्त्यावर सतत अपघात होत असल्याने हा रस्ता म्हणजे मृत्यूचा सापळा झाला आहे.त्याचप्रमाणे हिट अँड रन कायदा पास करून केंद्र सरकारने गोरगरीब ड्रायव्हर लोकांच्या समस्या वाढवल्या आहेत.हा कायदा अन्यायकारक आहे.हा कायदा रद्द करण्यात यावा व रस्ता त्वरित दुरुस्त करण्यात यावा,या मागणीसाठी माजी खा.जयसिंग गायकवाड,मुस्द्दीक ड्रायव्हर संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.एकतास सुरू असलेल्या या आंदोलना मुळे दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसत होत्या. आंदोलनाचे निवेदन नायब तहसिलदार अमोल शामसवाई यांनी स्वीकाले. आमदार यांनी दोनदा नितीन गडकरी यांची भेट घेतली, केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. परंतु रस्त्याचा मार्ग सुधारला नाही. रस्त्यावर अनेक वाहन चालकाचा बळी जाणे सुरूच आहे.अनेकजन जखमी झाले आहेत.त्यामुळे आ.आमदार साहेबांचे गडकरी यांची भेट म्हणजे नुसते फोटोशेशन ठरत असल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष मंजूर यांनी केला आहे तात्काळ रस्ता दुरुस्त करावा अशी मागणीही यावेळी मंजूर यांनी केली.

## परळीत तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील समता नगर भागात राहणार्या एका ३५ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सदरील तरूणाने कुठल्या कारणावरून आत्महत्या केली हे मात्र समजु शकले नाही. तरूणाने आपल्या राहत्या घरी घराच्या आडूला गळफास घेवून आत्महत्या केली. मृतदेहाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये शवविच्छेदन करण्यात आले. तरूणाच्या आत्महत्येचे कारण समजु शकले नाही.



एकता पत्रकार संघाच्यावतीने मूकनायक पुरस्कार दैनिक मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना जाहीर झाल्याने त्यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देताना मराठा आरक्षण लढ्यातील नेतृत्व तथा सामाजिक कार्यकर्ते बजगुडे इत्यादी.

## बीड जिल्हा पोलिस दलात पोलिस निरीक्षक उपनिरीक्षकांच्या बदल्या

**वडवणी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगर परीक्षेत्रातील विविध संवर्गातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी केलेल्या आहेत. पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील अधिकार्यांचा यात समावेश आहे. संभाजीनगर परिक्षेत्रातून १३ पोलीस निरीक्षक ४२ सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि २२ पोलीस उपनिरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस निरीक्षकांच्या बदल्यामध्ये बीड जिल्ह्यातील पाच अधिकारी बदलण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यातील १० पोलीस उपनिरीक्षकांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात आली असून तितकेच पोलीस उपनिरीक्षक बीड जिल्ह्यात आले आहेत.

## गाळमुक्त धरण योजना उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

धरणामध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणाच्या व तलावाच्या साठवण क्षमतेमध्ये मोठया प्रमाणात घट होत असून या धरणामध्ये साचलेला गाळ उपसा करून शेतात पसरविल्यास धरणाची मूळ साठवण क्षमता पुनर्स्थापित होण्याबरोबरच कृषी उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाच्या वतीने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योतना पुन्हा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही योजना राबविण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग नोडल आहे. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना शेतक-यांच्या हिताची असून शेतजमिनीला नवसंजीवनी देणारी आहे. यामुळे धरणाच्या साठवण क्षमता पुनर्स्थापित होऊन शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचे महत्व पाहता ती जोमाने राबविण्यासाठी शासनाकडून यंत्रसामग्री आणि इंधन दोन्हीचा खर्च देण्यात येणार आहे. तसेच अल्प व अत्यल्पभूधारक शेतक-यानां सुध्दा या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी ३५.७५/- घ.मी. प्रमाणे एकरी रु. १५,०००/- च्या मर्यादेत शेतक-यांना अनुदान देण्यात येणार आहे. बीड जिल्हयामध्ये मागील वर्षात एकूण ४४ प्रकल्पातुन गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत गाळ काढण्यात आला आहे.

# ज्योती मेटेंच्या उपस्थितीत शिवसंग्रामच्या निवडी जाहिर

**बीड । प्रतिनिधी**

आगामी काळातील निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर आणि संघटन बांधणीसाठी शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या हस्ते व प्रदेशाध्यक्ष श्री.तानाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसंग्राम महाराष्ट्र प्रदेश राज्यस्तरीय पदाधिकारी मार्गदर्शन शिबिर मंगळवारी पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात पार पडले. या मार्गदर्शन शिबिरात शिवसंग्रामच्या युवक बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.गणेश आत्माराम मोरे व छ.संभाजीनगर महानगर अध्यक्षपदासाठी श्री.कुलदीप काकासाहेब देशमुख यांना संधी देण्यात आली. डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष श्री.तानाजीराव शिंदे यांनी या निवडी जाहीर केल्या. विद्यार्थीदशेपासून चळवळीत सक्रिय असलेले ॲड.गणेश मोरे व श्री.कुलदीप

शिवसंग्राम

काकासाहेब देशमुखयांना ही संधी देण्यात आली असल्याचे प्रदेशाध्यक्ष श्री.तानाजीराव शिंदे यांनी सांगितले. ॲड. गणेश मोरे यांनी सन २०१७ मध्ये वडगाव कळसंबरच्या सरपंच पदाची निवडणूक लढवली व सरपंच म्हणून स्वतः जनतेतून निवडून आले. त्यानंतर लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्या समाजकारण व राजकारणास प्रेरित होऊन त्यांचा आदर्श घेत शिवसंग्राम संघटनेमध्ये प्रवेश केला सन २०१७ मध्ये शिवसंग्राम सरपंच संघटनेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. सन २०१८ मध्ये शिवसंग्राम युवक तालुका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली, सन २०१९ मध्ये शिवसंग्राम संघटनेचा पाली जिल्हा परिषद गणाचा सर्कल प्रमुख व शिवसंग्राम युवक आघाडीचा जिल्हा उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी मिळाली. ग्रामपंचायत निवडणूक २०२२ - २३ मध्येमध्ये पुन्हा सर्व ग्रामपंचायत सदस्यासह जनतेमधून सरपंच म्हणून ते निवडून आले व काल पुणे येथील राज्यस्तरीय चिंतन व मार्गदर्शन शिबिरादरम्यान शिवसंग्राम युवक आघाडीचा जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांना संधी देण्यात आली. युवक जिल्हाध्यक्ष पदाला साजेशी कामगिरी त्यांच्या हातून घडो यासाठी पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

## ग्रामीण भागाचा विकास हाच शिवसेनेचा ध्यास -खांडे

**बीड । प्रतिनिधी**

आतापर्यंत केवळ शहरी भागात विकास कामांचा धडाक्यात प्रारंभ व्हायचा. काही जणांनी ग्रामीण भागाकडे कायमच दुर्लक्ष केल्याने त्या भागात विकासाचे अनेक प्रश्न भिजत पडले. परंतु मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेबांच्या सरकारने ग्रामीण भागाच्या विकासासाठी निधीची बरसात केली असून ग्रामीण भागाचा विकास हाच शिवसेनेचा ध्यास असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी केले.



तालूक्यातील मौजे राक्षसभुवन येथे ४० लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ बुधवार दि.१७ जानेवारी रोजी जिल्हाप्रमुख खांडे यांच्या हस्ते झाला. राक्षसभुवन येथील विकास कामांच्या शुभारंभ प्रसंगी गावकऱ्यांची उपस्थिती होती. विकास कामांच्या शुभारंभ प्रसंगी जिल्हाप्रमुख खांडे म्हणाले की, आज राक्षसभुवन येथे २० लक्ष रु.च्या सिमेंट रस्त्याचा, १७ लक्ष रु.खर्चाच्या पाणी पुरवठा योजनेचा आणि ३ लक्ष रु.खर्चाच्या सार्वजनिक शौचालय बांधकामाचा प्रारंभ माझ्या हस्ते झाला याचा मला आंनद आहे. आनंद यासाठी की तुमच्या भागात विकास पर्व सुरु करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेबांचा एक प्रतिनिधी म्हणून उपस्थित आहे.अगोदरच्या काळात विकास हा फक्त नेत्यांचा आणि शहरी भागाचाच व्हायचा. परंतु ग्रामीण भागाचा विकास झाला तरच जनता सुखी होईल या हेतुने मुख्यमंत्री साहेबांनी विकासयुक्त गाव ही मोहिम हाती घेतली असून प्रत्येक गावात विकास योजना पोहचवण्यासाठी मी जिल्हाप्रमुख या नात्याने सातत्याने प्रयत्नशिल राहिल अशी ग्वाही जिल्हाप्रमुख खांडे यांनी या प्रसंगी दिली.

# मराठा आरक्षण मिळेपर्यंत वाढदिवस साजरा करणार नाही -बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा शिवक्रांती संघटनेचे संस्थापक गणेश दादा बजगुडे पाटील यांचा वाढदिवस दरवर्षी १८ जानेवारी रोजी वेगवेगळ्या सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाने आयोजित केला जात असतो परंतु यावर्षी मराठा आरक्षण व मराठा आरक्षणासाठी झालेल्या आत्महत्या लक्षात घेता मराठा आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत वाढदिवस साजरा करणार नसल्याची माहिती गणेश दादा बजगुडे यांनी कळवली. गणेश बजगुडे हे मराठा आरक्षण लढ्यातील एक सक्रिय नेते असुन मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर त्यांच्या नेतृत्वात छावा व शिवक्रांती संघटनेच्या माध्यमातून अनेक लक्षवेधी



मराठा आरक्षण

आंदोलने झालेली आहेत. बीड येथे रस्ता रोको, मोर्चा, निदर्शने, बीएसएनएल टॉवरवर भल्या पहाटे चढून केलेले आंदोलन असेल किंवा मुंबई आझाद मैदान येथे आमरण उपोषण देखील त्यांनी केलेले आहे. २०१७ मध्ये शिवक्रांती संघटनेच्या माध्यमातून मराठा आरक्षण व शिवस्मारकाच्या विषयावर मराठवाड्यात मराठा जागर अभियान देखील त्यांनी राबवले होते. आरक्षणाच्या मागणीसाठी काठ्या लठ्या कारावासही भोगलेला आहे. २००३ ते आजतागायत यामागणीसाठी सक्रियपने काम करत असल्याने सामाजिक जान व भान ठेवून त्यांनी वाढदिवस येतील जातील परंतु आरक्षणाचा विषय अत्यंत महत्वाचा आहे हे आंदोलन कुठेही भरकटू नये त्याच बरोबर आमच्या काही सहकाऱ्यांनी आरक्षण मुद्द्यावर आत्महत्या केलेल्या आहेत त्याच्या वेदना व दु:ख कायम असल्या कारणाने आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत वाढदिवस साजरा नकरण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती गणेश दादा बजगुडे यांनी दिली.

